# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### सोयाबीनला कमी दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(१) २३५७ (१८-०७-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५० लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड केली जात असून अंदाजे ५ कोटी क्विंटल सोयाबीन उत्पादन होत असूनही जागतिक बाजारात सोयाबीन पेंडला अपेक्षित भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना प्रति क्विंटल कमी दर मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील तीन वर्षात शेतकऱ्यांना प्रति क्विटल रुपये ४०००/- पेक्षा कमी दराने विक्री करावी लागली असून उत्पादन खर्चापेक्षा कमी दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याने सोयाबीनला प्रति क्विंटल रुपये ७०००/- दर मिळणाच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२७-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जागतिक बाजारपेठेतील सोयाबीन पेंडचे भाव, इतर देशातील सोयाबीनचे उत्पादन व दरांचा सुध्दा देशांतर्गत उत्पादीत शेतमालाचे बाजारभावांवर परिणाम होत असतो. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरीता नाफेड व एनसीसीएफ यांच्यामार्फत राज्यात हमीभाव योजनेंतर्गत खरेदी प्रक्रीया राबविण्यात येते.

(२) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माहे फेब्रुवारी व मार्च २०२५ वगळता हंगाम २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये सोयाबीन आवक विचारात घेता सरासरी दर ४०००/-प्रति क्विंटल पेक्षा खाली आलेले नाही.

राज्यशासनाने खरीप हंगाम २०२५-२६ साठी सोयाबीनला रुपये ७०७७/- प्रति क्विंटल हमीभाव देण्यासंदर्भात केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे शिफारस केली होती. केंद्र शासनाने हंगाम २०२५-२६ मध्ये सोयाबीनसाठी रुपये ५३२८/- प्रति क्विंटल प्रमाणे हमीभाव जाहीर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कांद्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्यासाठी सर्वंकष कृती आराखडा तयार करण्याबाबत

**(२) २४०८ (१८-०७-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांद्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून एक स्ट्रॅटेजी प्लॅन तयार करून कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी केंद्र शासनाकडे बैठक घेण्याचे मा.मंत्री पणन यांनी दिनांक १० मार्च २०२५ रोजी विधीमंडळात आश्वासन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आणि लोकप्रतिनिधी यांची बैठक घेवून केंद्राकडे जाण्यासाठी सर्वंकष कृती आराखडा तयार करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२७-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्याचे कृषी मंत्री व पणन मंत्री यांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय अन्न व ग्राहक व्यवहार मंत्री व केंद्रीय कृषीमंत्री यांची नवी दिल्ली येथे दिनांक ०७/०७/२०२५ रोजी प्रत्यक्ष भेट घेतली. सदर भेटीत नाफेड व एनसीसीएफ यांनी थेट शेतकऱ्यांकडून बाजार समितीतून कांदा खरेदी करावा, मध्यस्थांची भूमिका कमी करावी, सन २०२५-२६ मध्ये ५ लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करावा, कांदा थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करून डिबिटी (DBT)प्रणालीद्वारे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावेत, ही खरेदी प्रक्रिया पारदर्शकरित्या व्हावी यासाठी स्वतंत्र लेखापरीक्षक पथकाची नेमणूक करावी, यासह किरकोळ बाजारात कांद्याचा दर ४०-४५ रुपये किलोपर्यंत गेला तरच निर्यात शुल्क लावावे, जेणेकरून आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळू शकेल अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याबाबत

**(३) २४९५ (१८-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्च शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी राज्याचे बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (पश्चिम विभाग), केंद्राचे शिक्षा मंत्रालय आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असल्याचे माहे मार्च,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करार विद्यार्थ्यांसाठी कौशल्यवृद्धी, प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव आणि रोजगार क्षमतेच्या दृष्टीने महत्वाचा ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याचे बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (पश्चिम विभाग), केंद्राचे शिक्षा मंत्रालय आणि

उच्च शिक्षण संचालनालय यांच्यात झालेल्या सामंजस्य करारान्वये शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०४-२०२६) :** (१) राज्यातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण व प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (पश्चिम विभाग) [BOAT-WR], शिक्षण मंत्रालय, भारत सरकार आणि उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्यात नॅशनल अप्रेंटिसशिप ट्रेनिंग स्कीम (NATS) अंतर्गत दिनांक २ एप्रिल, २०२५ रोजी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे.
(२) सदर करार खालील कारणांमुळे महत्त्वपूर्ण ठरणार आहे: १.कौशल्यवृद्धी व उद्योग-अकादमिक दरी कमी करणे: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शैक्षणिक अभ्यासक्रम व उद्योगांच्या गरजा यांतील दरी कमी करण्यास मदत होईल.
२. प्रत्यक्ष कामाचा अनुभव (On-the-Job Training): अंतिम वर्षातील पदवी व पदविका विद्यार्थ्यांना किमान ६ महिने ते कमाल १ वर्ष कालावधीचे औद्योगिक प्रशिक्षण दिले जाईल.
३. रोजगार क्षमता वाढ: औद्योगिक अनुभवामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यात वाढ होऊन रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील.
(३) सदर करारान्वये शासनाकडून पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे: १.विद्यार्थी नोंदणी व समन्वय: राज्यातील सर्व विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांना पात्र विद्यार्थ्यांची नोंदणी NATS २.० पोर्टलवर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
२. अभ्यासक्रमात समावेशन (AEDP): विद्यापीठे व महाविद्यालयांना त्यांच्या अभ्यासक्रमांचे 'अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री/डिप्लोमा प्रोग्राम (AEDP) मध्ये रूपांतर करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.
३. विद्यावेतन (Stipend) अंमलबजावणी: प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना केंद्र शासनाकडून DBT द्वारे ५०% व उर्वरित ५०% उद्योगांकडून विद्यावेतन दिले जाते.
४. जागृती व प्रबोधन: BOAT (WR) यांच्या सहकार्याने कार्यशाळा व सेमिनार आयोजित करण्यात येत असून संस्थांना संकेतस्थळावर NATS २.० संदर्भातील माहिती प्रदर्शित करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
५. प्रमाणपत्र वितरण: प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना Certificate of Proficiency प्रदान करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पदांवरील नियुक्त्या करण्याबाबत

**(४) २५०० (१८-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ८९० पैकी १५१ महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्य नसल्याची माहिती माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महाविद्यालयांमध्ये प्रभारी प्राचार्य प्रशासनाचे कामकाज पाहत असून ९४ महाविद्यालयांमध्ये गत वर्षभरापेक्षा जास्त काळ कायमस्वरूपी प्राचार्य नाहीत, तसेच प्राचार्यांच्या दीर्घकाळ रिक्त असलेल्या पदांमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर आणि महाविद्यालयाच्या प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर्ण वेळ प्राचार्यच नसल्याने नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यास अडचणी येत असून प्राचार्यांच्या नियुक्त्यांमध्ये विलंब होण्याची नेमकी कारणे काय आहेत, तसेच, या रिक्त जागा कधीपर्यंत भरल्या जातील,
(४) असल्यास, मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या उर्वरित १५१ महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्य नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१५-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित १९९ व विनाअनुदानित ७४८ असे एकूण ९४७ महाविद्यालये आहेत. त्यापैकी २९६ महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्य कार्यरत असून ६५१ महाविद्यालयामध्ये प्रभारी प्राचार्य कार्यरत आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये ६४ व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये ५८७ असे एकूण ६५१ महाविद्यालयांमध्ये १ वर्षापेक्षा जास्त काळापासून प्रभारी प्राचार्य कार्यरत आहेत.
(३) व (४) शासन परिपत्रक दिनांक २३/०३/२०२१ व शासन निर्णय दिनांक १२/११/२०२१ अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये प्राचार्य पदभरतीसाठी मान्यता देण्यात आली आहे. दिनांक २३/०४/२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य संवर्गाच्या पदांचा पाच वर्षाचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी पदे भरण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राचार्य संवर्गाचे पद भरणेबाबतचा प्रस्ताव संबंधित संस्थेकडून प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून पद भरतीकरीता ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाते.

तसेच, विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पदभरतीबाबत कार्यवाही करण्याविषयी संबंधित विनाअनुदानित महाविद्यालयांना विद्यापीठ स्तरावरुन वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत महाविद्यालयांतील प्राध्यापकांची थकबाकी अदा करण्याबाबत

**(५) २५३३ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत

महाविद्यालयातील शेकडो प्राध्यापकांची थकबाकी प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राध्यापकांची थकबाकी प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत महाविद्यालयातील शेकडो प्राध्यापकांची थकबाकी अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०४-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ पर्यंतची रुपये ३६,०३,३१००० इतक्या रकमेची थकबाकी अदा करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत सन २०२४-२५ अखेर वेतन थकबाकी प्रलंबित नाही.

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयाचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन अदा करण्यात येते. यामधील शिल्लक तरतूद विचारात घेऊन थकबाकी प्रतिवर्षी संबंधितान अदा करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## बालभरती पाठ्य पुस्तकांत कोरी पाने देण्याच्या निर्णयाबाबत

**(६) २६६० (१८-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने बालभारतीतील पाठयपुस्तकांत वहयांची कोरी पाने देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा निर्णय मागे घेण्यात आला असला तरी त्यासाठी ६३ कोटी ६३ लाख ५३ हजार रुपयांचा खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन शालेय शिक्षणासाठी व्यवहार्य निर्णय व्हावेत, यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१५-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०८ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये २ री ते ८ वी च्या पाठ्यपुस्तकांत वह्यांची पाने समाविष्ट करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला होता.
(२) अंशत: खरे आहे.

दिनांक २८ जानेवारी, २०२५ च्या शासन निर्णयान्वये पाठ्यपुस्तकांत वह्यांची पाने समाविष्ट करण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. उपरोक्त शासन निर्णय रद्द झाल्यानंतर यान्वये

कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.
(३) भविष्यात हे टाळण्याकरीता कोणताही निर्णय घेताना अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या उपक्रमाची प्रायोगीकता व त्याचा वित्तियभार या सर्व बाबी तपासून निर्णय घेतला जाणार आहे. तसेच उपक्रमाचा प्रभाव बघण्यासाठी "पथदर्शी प्रकल्प" यांच्या माध्यमाद्वारे उपक्रमाची सफलता बघून त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनेक गावातील शेतकऱ्यांच्या टोमॅटो पिकास हमीभाव देण्याबाबत

**(७) ३१४८ (१८-०७-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओतूर, डिंगोरे, रोहोकडी, धोलवड, ठिकेकर वाडी, उदापूर, आंबेगव्हाण, अहिनेतविडी, (ता.जुन्नर, जि.पुणे) या परिसरातील अनेक शेतकरी अल्पकाळात भरपूर व रोख उत्पन्न देणारे पिके म्हणून टोमॅटो पीक घेतात मात्र या टोमॅटो पिकाच्या नारायणगाव मार्केट कमिटी येथील मार्केटमध्ये २० किलोच्या एका क्रेटला ३० ते ७० रुपयांचा मातीमोल भाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आले असल्याने टोमॅटो उत्पादक शेतकऱ्याना योग्य दर देऊन हमीभाव देण्याची मागणी माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान करीत असल्याचे येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या टोमॅटो उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना टोमॅटो उत्पादनाला योग्य तो हमीभाव देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२०-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.
टोमॅटो पिकास हमीभाव देणेबाबतचे निवेदन कार्यालयीन अभिलेखात आठळून आले नाही. टोमॅटो पीक नाशंवत असल्याने त्याचा हमीभाव योजनेत समावेश करण्यात आलेला नाही.
(२) शासन निर्णय दिनांक १८ जुलै, २०२५ अन्वये राज्यातील कांदा व टोमॅटो पिकांचे धोरण ठरविणे व विविध उपाययोजना सुचविण्यासंदर्भात समिती गठित करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य सहकारी ग्राहक महासंघाच्या निवडणूक प्रक्रियेबाबत

**(८) ३४९२ (१८-०७-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सहकारी ग्राहक महासंघाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची प्रक्रिया नामनिर्देशन अर्ज भरण्यापर्यंत आल्यावर त्यास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यामुळे सदर निवडणूक प्रक्रिया अद्यापपर्यंत झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक मंडळाचा कालावधी सन २०२० मध्ये संपुष्टात आला असून सन २०२५ पर्यंत म्हणजे ५ वर्षे निवडणूक न झाल्यामुळे तेच संचालक मंडळ कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे संचालक मंडळ बरखास्त करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७८ नुसार प्राधिकृत अधिकारी/प्रशासक मंडळ नियुक्त करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या दिनांक १८ फेब्रुवारी,२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने मा.उच्च न्यायालयाची स्थगिती उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (२७-०३-२०२६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राज्य सहकारी ग्राहक महासंघाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीवर मा.उच्च न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली होती. परंतु सद्य:स्थितीत दिनांक ०९/१२/२०२५ पासून नवीन संचालक मंडळ निवडून आलेले आहे.
(३) व (४) हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य ग्राहक सहकारी महासंघ, मुंबई या संस्थेवर प्राधिकृत अधिकारी/प्रशासक मंडळ नियुक्त करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी यांची मागणी प्राप्त झाली होती. त्यानुसार सदर संस्थेवर तीन सदस्यांचे अशासकीय प्रशासकीय मंडळ नियुक्ती करण्याबाबत दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्राधिकृत समितीची नियुक्ती करण्यात आली होती.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था मर्या. चिपळूण या संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी होणेबाबत

**(९) ३२८० (१८-०७-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक १४२२ ला दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था मर्या., चिपळूण (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या संस्थेमध्ये सहकार कायदा व संस्थेचे मंजूर पोटनियम डावलून नियमबाह्य कारभार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सभासद व कर्मचारी यांना नियमबाह्य कर्ज वितरण तसेच संस्थेचे अधिकारी /कर्मचारी, नातेवाईकांना ठेवीवर जादा दराने व्याज दर देऊन ठेवी स्विकारणे, सभासदांना भाग दाखले न देणे, संस्थेच्या संचालक मंडळातील सदस्यांकडे थकबाकीची रक्कम असूनसुध्दा वार्षिक अहवालात जाणीवपूर्वक ती न दाखवणे, संस्थंच्या सभासद कर्जाची वसुली करतांना प्रत्यक्षात वसुली न करता कोट्यवधी रुपये कर्जाचे नुतनीकरण करुन देणे, अशा प्रकारे गैरव्यवहार सुरु असून संस्थेवर प्रशासक नियुक्त करुन संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, मा.सहकार

मंत्री, मा.सचिव (सहकार), मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचेकडे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारींच्या अनुषंगाने सहकार आयुक्त कार्यालयाकडून चौकशी करण्याकरीता दिनांक ०३/०२/२०२५ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड, सहाय्यक निबंधक, माणगांव, सहकारी संस्था,लेखापरिक्षक, श्रेणी-२ सहकारी संस्था,पणन, पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहाराची चौकशी करणेसाठी प्रशासक नियुक्त करण्याबाबत तसेच गैरव्यवहार करणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी, सभासद, अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (१५-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
यासंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता सहकार आयुक्त कार्यालयाकडून दिनांक ०३/०२/२०२५ रोजी खालीलप्रमाणे प्रथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.
१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-
पथक प्रमुख
२. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माणगांव
जि.रायगड. - सदस्य
३. लेखापरिक्षक, श्रेणी-२ सहकारी संस्था, पणन,
रायगड- सदस्य
(४) मा.राज्यमंत्री (सहकार) यांनी दिनांक ०१/०८/२०२५ रोजीच्या आदेशान्वये सहकार आयुक्त कार्यालयाचे दिनांक ०३/०२/२०२५ चे चौकशीचे आदेश रद्द केले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य सहकारी ग्राहक महासंघाचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नेमणूक करण्याबाबत

**(१०) ३४९० (१७-०७-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य कन्झुमर फेडरेशनच्या संचालक मंडळाची मुदत संपून १० वर्ष पूर्ण झाली असून विविध कारणे पुढे करुन सदर संस्थेची निवडणूक पुढे ढकलली जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुदत पूर्ण झालेले संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नेमणूक करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (२०-०५-२०२६) :** (१) हे खरे आहे.

राज्य सहकारी ग्राहक महासंघाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीवर मा.उच्च न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली होती.

(२) व (३) हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य ग्राहक सहकारी महासंघ, मुंबई या संस्थेवर प्राधिकृत अधिकारी/प्रशासक मंडळ नियुक्त करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी यांची मागणी प्राप्त झाली होती.

त्यानुसार सदर संस्थेवर तीन सदस्यांचे अशासकीय प्रशासकीय मंडळ नियुक्ती करण्याबाबत दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये त्रिसदस्यीय प्राधिकृत समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सद्य:स्थितीत दिनांक ०९/१२/२०२५ पासून नवीन संचालक मंडळ निवडून आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्वी (जि.वर्धा) येथील लोअर वर्धा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांचे निराकरण करण्याबाबत

**(११) ४०५६ (१८-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) येथील लोअर वर्धा प्रकल्पातील अनेक वर्षापासून प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांचे निराकरण करण्यासाठी एकूण १९ वसाहतीच्या २१ नागरी सोईसुविधांकरीता ३० कोटी रुपये मंजूर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २२ एप्रिल,२०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोअर वर्धा प्रकल्पांमध्ये एकूण १९ गावे बुडीत क्षेत्रामध्ये गेली असून १९ वसाहतीचे कामे करताना नियमाचे पालन न करता निकृष्ट दर्जाची कामे केल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मागण्यांचे निराकरण करुन त्यांच्या वसाहतींना नागरी सोयीसुविधा पुरविण्याकरीता दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने ३० कोटींचा निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

मा.आमदार श्री.दादारावजी केचे वि.प.स. यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २२ एप्रिल २०२५

रोजी निवेदनाद्वारे केली आहे. तसेच सदर निवेदनाचे उत्तर सविस्तर माहितीसह निवेदनकर्ते मा.श्री.दादाराव केचे वि.प.स यांना दिनांक २१/०५/२०२५ अन्वये महामंडळाने दिले आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

निम्न वर्धा प्रकल्पामध्ये वर्धा जिल्ह्यामधील २० बाधित गावांचे पुनर्वसन २३ पर्यायी गावठाणांमध्ये करण्यात आलेले आहे. सर्व पुनर्वसित गावठाणामधील १८ नागरी सुविधांची कामे महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम सन १९९९ नुसार प्रकरण तीन मधील कलम १०(३) नुसार पुरविण्यात आलेल्या असून, दिनांक १/०८/२००९ शासन निर्णयात पुनर्वसित विस्तारीत गावांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी मापके निश्चित करण्याबाबत नमूद असून त्यानुसार सर्व नागरी सुविधांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर बांधकाम सन २००८-०९ ते २०१६ पर्यंत केलेले असून २३ पर्यायी गावठाणापैकी निंबोली-दवलतपुर वगळता २२ पुनर्वसित गावठाणातील १८ नागरी सुविधा दिनांक ३०/१०/२०१७ रोजी जिल्हा परिषद, वर्धा यांना हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. तसेच केलेल्या नागरी सुविधा क्षतीग्रस्त झाल्यामुळे सदर नागरी सुविधांच्या देखभाल व दुरूस्तीकरीता रुपये ३०.९५ कोटी (वर्धा जिल्हा-२५.७९ कोटी व अमरावती जिल्हा-५.१६ कोटी) कोटी खर्चाच्या प्रस्तावास दिनांक १४/०९/२०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता मिळाली होती. त्यानुसार देखभाल व दुरूस्तीकरीता रुपये ३०.९५ कोटी मधील कामाचे अंदाजपत्रक तयार करून जिल्हाधिकारी, वर्धा यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानुसार दर्जेदार व देखभाल दुरूस्तीची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.
(३) सर्व पुनर्वसित गावठाण १८ नागरी सुविधांसह जिल्हापरिषदेला हस्तांतरित झालेली असल्याने प्रत्येक गावांचा ग्रामपंचायतमार्फत प्रशासकीय कारभार सुरू आहे. तरी पुढील कार्यवाही जिल्हा परिषद व पंचायत समितीमार्फतच होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात महसूल उत्पन्न वाढविण्यासाठी कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(१२) ४२१४ (१८-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तंत्रनिकेतनांना त्यांच्याकडील उपलब्ध साधानसामग्री, प्रशिक्षित तांत्रिक मनुष्यबळ आणि सुविधांचा जास्तीत जास्त वापर करुन महसुली उत्पन्नात वाढ करण्याबाबत बावीस वर्षापूर्वी धोरणात्मक निर्णय घेतला असल्याचे माहे, मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोरणांनुसार तंत्रनिकेतनांना विविध चाचण्या आणि सल्लागार सेवा पुरविण्याची परवानगी देण्यात आली असून उद्योग आणि समाजासाठी पूरक सेवा-सुविधा उपलब्ध करणे, उत्पादन केंद्रात वाढ करणे, उपकरणे व सुविधा भाड्याने देणे आणि अंशकालीन अभ्यासक्रम शिक्षण कार्यक्रम सुरु करणे असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त उपक्रमातून शासकीय तंत्रनिकेतनचे उत्पन्न वाढवण्याऐवजी नांदेडच्या तंत्रनिकेतनमधील संबंधित यंत्रणेने शासनाची फसवणूक करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नांदेडच्या तंत्रनिकेतनमधील संबंधित यंत्रणेने शासनाची फसवणूक करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०५-०६-२०२६) :** (१) राज्यातील तंत्रनिकेतन महाविद्यालयात महसूल उत्पन्न वाढविण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २९/१२/१९९३ रोजी निर्गमित केला होता.या योजनेची व्याप्ती वाढविणारा सुधारीत शासन निर्णय दिनांक ३१/०५/२००३ रोजी निर्गमित करण्यात आला होता.
(२) होय हे खरे आहे.
(३) सदर बाबतच्या तक्रारीचे अनुषंगाने. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नांदेड यांनी याचिका OM/CA NO-७००/२०२४ या प्रकरणी दिनांक ९/०५/२०२५ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे नांदेड यांना सदर प्रकरणी तपास करण्याचे आदेश दिले होते.
(४) माहे मार्च –एप्रिल २०२४ मध्ये महालेखापाल कार्यालयाकडून झालेल्या लेखा परिक्षणा दरम्यान अतिरिक्त मानधनाची बाब निदर्शनास आल्याने संचालनालयाने दिनांक ०१/०७/२०२४ च्या परिपत्रकान्वये केवळ शासन निर्णयानुसार देय २०% मर्यादितच मानधन वितरण करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दिनांक १३/१०/२०२४ शासन पत्रातील निर्देशानुसार समिती नेमून अतिरिक्त मानधन रक्कमेची निश्चिती करण्यात येऊन शासनाचे निर्देशानुसार अतिरिक्त मानधन वसूलीची कार्यवाही सुरु झाली होती.मात्र प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्याने सद्य:स्थितीत वसूलीची कार्यवाही स्थगित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शहरांमध्ये वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(१३) ४४६८ (१८-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये माहे मार्च, २०२५ पासून उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून उष्णतेचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना शासनाकडून करण्यात आलेल्या नसल्याचे तसेच 'एसएफसी' या संस्थेच्या अभ्यासानुसार जागतिक तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर भारत सज्ज नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विशेषतः मुंबई, पुणे, औरंगाबाद यांसारख्या शहरांमध्ये उष्णतेच्या लाटेविरोधात संरचनात्मक पातळीवर कोणतीही अंमलबजावणी होत नसल्यामुळे नागरिकांचे आरोग्य, दैनंदिन उपजीविका व उत्पादकता यावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हवामान बदलाचा सामना करण्यासाठी 'हिट वेव्ह ॲक्शन प्लान', 'हवामान सहनक्षम आराखडा' यांसारख्या जागतिक उपाययोजनांचा अवलंब न केल्यामुळे आणि केंद्र व राज्य पातळीवर समन्वयाचा अभाव असल्यामुळे प्रशासनाची तयारी अपुरी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या पार्श्वभूमीवर नागरी आरोग्य रचना, सार्वजनिक प्रवासी व्यवस्थापन, पाणीपुरवठा, वीजपुरवठा व कामकाजाचे वेळापत्रक इत्यादी बाबींचा समावेश असलेली दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२१-०४-२०२६) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशास अनुसरुन सर्व उष्माघात प्रवण जिल्हयांकडून "उष्मालाट कृती आराखडे" तयार करण्यात आले आहेत. आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून "महाराष्ट्र राज्य उष्मालाट कृती आराखडा" सन २०२४ मध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे.
(४) शासनाकडून उष्मालाट प्रभावित क्षेत्रासांठी पुर्व सुचना देण्यात येते. या कालावधीत नागरिकांनी काय खबरदारी घ्यावी. याबाबतची माहिती विविध प्रसार माध्यमांमार्फत तसेच राज्य आपत्ती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात येते.

आपत्ती व्यवस्थापन प्रभागाच्या दिनांक २३ मार्च, २०२३ च्या शासन परिपत्रकान्वये उन्हाळी हंमागातील उष्मालाटेमुळे उदभवणाऱ्या मानव, पशु प्राणी व शेती पिकांवर होणारे दुष्परिणाम टाळण्याच्या दृष्टीने जिल्हा स्तरावर विविध विभागांनी करावयाच्या उपाययोजनासंदर्भात सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यातील उद्योगांमध्ये ८०% स्थानिकांना रोजगार देण्याबाबत

**(१४) ४६२८ (२६-०८-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य हे रोजगार उपलब्ध करून देण्यासंदर्भातील देशातील क्रमांक एकचे राज्य ठरले असून रोजगार उपलब्ध करून देण्याची महाराष्ट् राज्याची क्षमता ८४ टक्के असल्याचे सर्वेक्षण इंडिया स्किल रिपोर्ट २०२५ च्या अहवालानुसार दिनांक १५ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना आतापर्यंत कोणत्या जिल्ह्यात किती जणांना नोकरी दिली याची आकडेवारी कौशल्य विभागाकडे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील उद्योगांमध्ये ८०% स्थानिकांना रोजगार देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०७-०४-२०२६) :** (१) इंडिया स्किल रिपोर्ट, २०२५ नुसार महाराष्ट्राची रोजगारक्षमता (Employability) ८४ टक्के असून सदर प्रमाण देशात सर्वाधिक आहे.
(२) अंशत: खरे आहे.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या www.mahaswayam.gov.in या

वेबपोर्टलवर नोकरीइच्छुक (Job seekers) उमेदवारांची नोंदणी केली जाते. सदर नोंदणीकृत उमेदवारांची माहिती या विभागाकडे उपलब्ध आहे.

(३) औद्योगिक विकासातून होणाऱ्या आर्थिक फायद्यामध्ये महाराष्ट्रातील स्थानिक लोकांना योग्य हिस्सा मिळावा तसेच स्थानिक लोकांची बेरोजगारी कमी व्हावा, या दृष्टीकोनातून स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचे धोरण राज्य शासनाने सन १९६८ पासून अवलंबिले आहे. या धोरणाची परिणामकपणे अंमलबजावणी करण्यासाठी उद्योग विभागाच्या दिनांक १७/११/२००८ च्या शासन निर्णयान्वये सुधारित कार्यपध्दती जाहीर केली आहे. सदर सुधारित कार्यपध्दतीनुसार सर्व औद्योगिक उपक्रमांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय श्रेणीसहित इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि संवादकौशल्य वाढविण्यासाठी वर्तुळाकार बैठक रचना लागू करण्याबाबत

**(१५) ४७४८ (१७-१२-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या तसेच खाजगी अनुदानित व विनाअनुदानित अशा सर्वच शाळांमध्ये अध्यापनासाठी वर्गात एका मागोमाग एक बेंच लावून शिकवण्याची पारंपरिक रचना प्रचलित आहे. अशा बेंच रचनेच्या पध्दतीमुळे पाठीमागे बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात "बॅकबेंचर" असा न्यूनगंड निर्माण होतो आणि त्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात घट होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये या पारंपरिक रचनेऐवजी वर्तुळाकार बैठक पध्दतीचा अवलंब करून 'केरळ पॅटर्न'नुसार विद्यार्थी-केंद्रित संवादात्मक शिक्षणाचा प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात आला आहे, अशा प्रकारची बैठक रचना केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि समवेत शिकण्याची सकारात्मकता वाढते हे प्रत्यक्ष निरीक्षणातून दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या समतोल सहभागासाठी आणि शिक्षणातील गुणवत्तावाढीसाठी शासनाने सर्व शाळांमध्ये अशा वर्तुळाकार बैठक रचनेची अंमलबजावणी करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०७-०४-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

बहुतेक शाळांमध्ये चक्रकार पध्दतीने विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था केली जाते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांची जागा सुरुवातीला किंवा शेवटी असेलच असे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

राहुरी नगरपालिका शिक्षण मंडळाच्या मराठी माध्यमाच्या १२ आणि उर्दू माध्यमाची १ अशा एकूण प्रयोग १३ शाळा आहेत. यातील नूतन मराठी शाळा, नंबर ९, येवले वस्ती या शाळेत वर्तुळाकार बैठक व्यवस्था अवलंबली आहे. अशा प्रकारची बैठक रचना केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि समवेत शिकण्याची सकारात्मकता वाढते हे प्रत्यक्ष निरीक्षणातून दिसून आले आहे.
(३) बहुवर्ग शाळांमध्ये किंवा अधिक पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये जागेअभावी विद्यार्थ्यांसाठी वर्तुळाकार बैठक व्यवस्थेची अंमलबजावणी कशाप्रकारे करता येईल ही बाब देखील तपासणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बी.बी.ए., बी.सी.ए. व बी.एम.एस. या पदवी अभ्यासक्रमाकरिता पारदर्शक प्रक्रिया राबविण्याबाबत

**(१६) ५२८० (१७-१२-२०२५) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस. या पदवी अभ्यासक्रमांचे नियंत्रण दोन वर्षांपूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे हस्तांतरित झाल्यामुळे या अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या यादीत स्थान मिळाले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने केंद्र शासनाकडे तर केंद्राने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे जबाबदारी सोपविल्याने यंदाही बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेत गोंधळ निर्माण झाल्यामुळे धोरण स्पष्टता नसल्याचा परिणाम सांगली जिल्ह्यातील व राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना गत वर्षापासून त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तंत्र शिक्षण परिषदेच्या धोरणात बदल करून बी.बी.ए., बी.सी.ए. अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०५-०५-२०२६) :** (१) होय खरे आहे.

बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए. हे पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आले. त्यानुसार राज्यातील या अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून शासनाने दिनांक २९/०२/२०२४ च्या पत्रान्वये मान्यता दिलेली आहे.
(२) हे खरे नाही.

बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत गोंधळ निर्माण होऊन सांगली जिल्ह्यातील व राज्यातील विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.

---

## अलमट्टी धरणाच्या समस्येबाबत अहवाल सादर करणेबाबत

**(१७) ५२९६ (१७-१२-२०२५) श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक २५२७ ला दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा नदीवरील अलमट्टी धरणाच्या जलाशयाची पातळी वाढवल्यास महाराष्ट्रातील सांगली व कोल्हापूर जिल्ह्यासह कृष्णा नदीकाठच्या परिसराला फटका बसू शकतो, यामुळे अलमट्टी धरणाची उंची वाढवू नये, यासाठी कर्नाटक सरकारला निर्देश द्यावेत, अशी विनंती राज्य शासनाने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाकडे केली असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाच्या जलाशयाची पातळी ५१९.६ मीटर वरून ५२४.२५६ मीटर करण्याचा निर्णय घेतल्याने राज्यातील सांगली, कोल्हापूर जिल्ह्यासह कृष्णा नदीकाठच्या परिसरात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याचे राज्य शासनाने व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरमुळे निर्माण होणाऱ्या पूरस्थितीचा अभ्यास सिमुलेशन व हायड्रॉनामिक्स पध्दतीने करण्याचे काम NIH, Roorkee रूरकी येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हायड्रोलॉजी यांच्याकडे सोपविण्यात आले असून, या अभ्यासाचा अहवाल अद्याप शासनाला प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित अहवाल प्राप्त होईपर्यंत धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय घेऊ नये, असेही राज्य शासनाने आपल्या निवेदनात नमूद केले असून याबाबत सद्य:स्थितीचा सविस्तर अहवाल सादर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

अलमट्टी धरणाची उंचीवाढ न करण्याबाबत कर्नाटक सरकारला निर्देश देण्यासंदर्भात मा.मंत्री, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावर दिनांक २९/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. यानुषंगाने, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार, यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०४/०८/२०२५ रोजी श्रमशक्ती भवन, दिल्ली येथे मा.मंत्री (जलसंपदा) महाराष्ट्र राज्य व इतर लोकप्रतिनिधीं समवेत बैठक संपन्न झाली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ हायड्रॉलॉजी (NIH), रूरकी यांचेकडून या अभ्यासाचा अंतिम अहवाल दिनांक १२/११/२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाचा अभ्यास करुन सविस्तर अहवाल तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) हे खरे आहे.

अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरच्या परिणामाबाबत तसेच पूरपरिस्थितीबाबत अभ्यास अहवाल अंतिम होईपर्यंत उंचीवाढीचा निर्णय न घेण्याबाबत मा.मुख्यमंत्री, कर्नाटक राज्य यांना मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावर दिनांक २९/०७/२०२५ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हायड्रोलॉजी यांचेकडून प्राप्त अंतिम अहवालाचा अभ्यास करून सविस्तर अहवाल तयार करणेबाबत कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील पीक कर्जासाठी ५८६ गावांमध्ये कर्ज पतपुरवठा सहकारी संस्था नसल्याबाबत

**(१८) ५६५२ (१७-१२-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील जनगणनेनुसार असलेल्या ९९८ गावांपैकी केवळ ४१४ गावांमध्ये प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था कार्यरत असून ५८६ गावांमध्ये कर्ज पतपुरवठा संस्थांची स्थापनाच करण्यात आली नसल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक महसुली गावांत एक संस्था कार्यरत राहावी, यासाठी शासनाने (सहकार विभाग) प्रक्रिया सुरु केली असून या संस्थांची विविध उपक्रमातून आर्थिक उन्नती होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ५८६ गावांनुसार अकोला, बार्शीटाकळी, मुर्तिजापूर,अकोट, तेल्हारा, बाळापूर व पातूर या तालुक्यातील गावांमध्ये सहकार विभागाअंतर्गत अद्याप कर्ज पतपुरवठा संस्थाच स्थापन केल्या नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रत्येक महसुली गावात कृषी पतपुरवठा संस्था निर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली व त्यापैकी किती संस्था स्थापन करुन कृषी पतपुरवठा करण्यात आला व येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (१७-०४-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अकोला जिल्ह्यात एकून ९१९ महसूली गावे असून ४१३ महसूली गावांमध्ये प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे मुख्यालय आहेत. सदर ४१३ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांना उर्वीरित ५०६ महसूली गावे संलग्न असल्यामुळे यांच्यामार्फत प्रत्येक गावाला कर्जपुरवठा करण्यात येतो.

शासन निर्णय दिनांक १७/०२/२०२६ अन्वये राज्यात नवीन प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या (PACS) नोंदणीचे निकष सुधारित करण्यात आले आहे. त्यानुसार एका महसुली गावात एकच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था असेल, तसेच नव्याने नोंदणी होणाऱ्या प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेची नोंदणी करताना त्या संस्थेच्या कार्यक्षेत्रातील किमान १० आर (गुंठे) क्षेत्र धारण करणाऱ्या एकूण खातेदारांपैकी किमान ७० टक्के खातेदार प्रवर्तक सभासद अथवा ७५ खातेदार यापैकी कमी असेल तितके खातेदार नियोजित संस्थेच्या प्रस्तावात प्रवर्तक सभासद असणे आवश्यक राहील.

(३) व (४) अकोला जिल्ह्यातील ज्या महसूली गावांमध्ये प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे मुख्यालय नाही अशा एकूण ५०६ गावांमध्ये दिनांक १७/०२/२०२६ च्या शासन निर्णयातील निकषानुसार पात्र प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची नोंदणी करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील फार्मसी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत विलंब होत असल्याबाबत

**(१९) ५७३१ (१७-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोविड काळापासून सुरू झालेला फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेतील विलंबाचा परिणाम सलग तिसऱ्या वर्षी देखील होत असून, प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिस्थितीत संबंधित महाविद्यालयांना तात्पुरत्या स्वरूपात प्रवेश देण्याची वेळ येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात माहिती घेऊन सदरील प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक ठराविक कालावधीत जाहीर व्हावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०५-०५-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत फार्मसी या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरणे व निश्चिती करणे ही प्रक्रिया दिनांक ०७ जुलै, २०२५ रोजी सुरु करण्यात आलेली होती. परंतु, प्रत्यक्ष केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया माहे सप्टेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यापासून सुरु करण्यात आली. त्यानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत प्रवेश प्रक्रियेच्या नियमानुसार केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या चार फेऱ्यांचे तसेच रिक्त राहीलेल्या जागा तसेच संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेचे संपूर्ण वेळापत्रक दिनांक २४/०९/२०२५ रोजी उमेदवार / पालक / संस्था यांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदर वेळापत्रकानुसार केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेची चौथी फेरी दिनांक १०/११/२०२५ रोजी आणि रिक्त जागा व संस्थास्तरावरील जागांची प्रवेश प्रक्रिया दिनांक १७/११/२०२५ रोजी सुरळीतपणे संपन्न झालेली आहे.
(३) औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली (पीसीआय) या शिखर परिषदेची मान्यता अनिवार्य असते. शिखर परिषदेच्या मान्यतेनंतर पदवी अभ्यासक्रमांसाठी संबंधित विद्यापीठाची संलग्नता घेणे अनिवार्य असते. ज्या संस्थांना पीसीआयची मान्यता व संबंधित विद्यापीठाची संलग्नता असते केवळ त्याच संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश फेऱ्यामध्ये (कॅप) करण्यात येतो. मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल C.A. No. ९०४८/२०१२ मधील M.A. No. १५९३/२०२५ च्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०८-०९-२०२५ रोजीच्या आदेशान्वये फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना संस्थांची मान्यता प्रक्रिया राबविण्यासाठी दिनांक ३०-०९-२०२५ पर्यंत आणि या संस्थांच्या मान्यता प्रक्रियेत अपील दाखल करण्याकरीता दिनांक १०-१०-

२०२५ पर्यंत मुदतवाढ दिलेली होती.

तसेच राज्यातील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश फेरी (कॅप-ऑप्शन फॉर्म) सुरु करण्याकरीता परवानगी मिळण्याबाबत फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत ई-मेल व्दारे अवगत करण्यात आलेले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत

**(२०) ५७६४ (१७-१२-२०२५) श्री.संदीप जोशी, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग या राज्यास पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयास सादर करण्यात आला होता व त्यांच्या मान्यते नंतर दोन्ही राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ११ जुलै, २०२४ रोजीच्या शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ११ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार जर्मनीमध्ये रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी डिस्ट्रीक्ट इन्स्टिट्यूट एज्युकेशनल ट्रेनिंग (DIET) रविनगर, नागपूर या संस्थेव्दारे विद्यर्थ्यांकडून कागदपत्रांची तपासणी व पडताळणी दिनांक ०४ आक्टोबर, २०२४ ला पूर्ण करण्यात आली असूनही शासनाकडून अद्याप पर्यंत कोणतेही निर्देश किंवा आदेश नसल्याने डिस्ट्रीक्ट इन्स्टिट्यूट एज्युकेशनल ट्रेनिंग (DIET) रविनगर, नागपूर या संस्थेने योग्य कार्यवाही केली नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत रोजगाराची संधी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संबंधित संस्थेकडून माहिती मागवून नियमानूसार कार्यवाही करण्याचे आदेश देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी पत्राव्दारे निवेदन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-०४-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२४ रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नागपूर यांच्याकडून उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी व पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे. भाषा प्रशिक्षण वर्गासाठी उमेदवारांच्या प्रशिक्षणाकरीता राज्यातील इच्छूक शिक्षकांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) शासन निर्णय दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग या राज्यासोबत केलेल्या कराराच्या अनुषंगाने स्थापन केलेल्या राज्यस्तरीय कृती गटामध्ये समन्वयक नेमण्यात आले आहेत. तसेच, शासन निर्णय दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२६ अन्वये Maharashtra State International Employment and Skill Advancement Forum ची कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत कलम ८ अन्वये नोंदणीसाठी MOA आणि AOA ला मान्यता दिलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.